>> अभिजित थिटे

# घडो ऑनलाइन ऑफलाइनचे एकत्व

सासवडच्या साहित्य संमेलनात आणि आता येऊ घातलेल्या साहित्य संमेलनात एक साम्य आहे. या दोन्ही संमेलनात ऑनलाइन माध्यमांमध्ये किंवा सोशल नेटवर्किंग साइट्सवर साहित्य निर्मिती करणाऱ्यांचा सहभाग आहे. सासवडच्या संमेलनात 'छंदोबद्ध कविता मागे पडते आहे का?' हा परिसंवादाचा विषय वाचून सोशल नेटवर्किंग साइट्सवर छंदोबद्ध कवितांचे पेज चालविणारे काहीजण पुढे आले. त्यांनी साहित्य महामंडळाशी संपर्क साधला आणि महामंडळानेही त्यांना सामावून घेतले. याहीवेळा असेच झाले आहे. लघु आणि लघुत्तम कथांना व्यासपीठ देणाऱ्या 'नुक्कड' या ब्लॉगची दखल संमेलनाने घेतली. या कथांचे वाचन संमेलनात होणार आहे.

**मराठी साहित्यात आता ऑनलाइनचा मोठा प्रवाह दिसू लागला आहे. या माध्यमांतून व्यक्त होणारा हा वर्ग तरुण आहे. यंदाच्या साहित्य संमेलनात ऑनलाइन माध्यमांतील कथांना स्थान मिळाले आहे. ऑनलाइन आणि ऑफलाइन अशा दोन्ही माध्यमांचे एकत्व होणे, ही मराठी साहित्याचा प्रवाह विस्तीर्ण करणारी घटना असेल.**



हे सारे चित्र आशादायक आहे. दोन संमेलनांमध्ये वर्षांचे अंतर आहे हे मान्य; पण काही कालखंडाने का होईना, कोणीतरी ते अंतर पार करण्याचा प्रयत्न करते आहे, हेही चित्र सुखद आहे. ऑनलाइन माध्यमे आली आणि त्यांचा झपाट्याने प्रसार झाला. हे माध्यम हाताळणाऱ्यांमध्ये तरुणांची संख्या अर्थातच मोठी आहे. ही मंडळी व्यक्त होण्यासाठी याच माध्यमांचा वापर करतात. पोस्ट, ब्लॉग, पेजेस आणि ई-बुकमध्ये रमतात. त्यांचे विषय वेगळे आहेत. त्यांचा जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा आहे. त्यांचे जगणे भिन्न आहे आणि त्यामुळे त्यांची अभिव्यक्तीही वेगळीच आहे. लघु आणि लघुत्तम कथा हे त्याचेच एक रूप. कविता, विविध प्रकारच्या कथा, कादंबरी हे प्रकारही या माध्यमात हाताळले जातात. कोणालाही व्यक्त होण्याची मुभा ऑनलाइन माध्यमे देतात, ही त्यांची मोठी ताकद आहे; तसेच त्यावर वाचकांशी थेट संवादही होतो. आवडले, नाही आवडले हे लगेचच समजते. प्रतिक्रिया नोंदविता येतात. त्या लेखकापर्यंत लगेच पोहोचतात. एकूणच या माध्यमाला वेग आहे आणि सध्याच्या वेगवान तरुणाईला तो पसंत पडणारा आहे. पुस्तक किंवा लेख लिहिण्याच्या पायऱ्या असतात. काही टप्पे असतात. पुढे लिहून झालेले प्रसिद्ध करण्याचे टप्पे वेगळे. वेळ वेगळा. त्यापेक्षा लिहिले आणि ब्लॉगवर प्रसिद्ध केले, हे सोपे.

या सगळ्यामुळे झाले काय, तर ऑनलाइन माध्यमांमध्ये व्यक्त होणारा हा लेखक पारंपरिक माध्यमांत लिहिनासा झाला. त्या माध्यमांपासून तो दूर राहू लागला. फटकून वागू लागला. या सगळ्या टप्प्यांपेक्षा आपले चाललेले बरे आहे, असा त्याचा विचार होत गेला. हा मोठा प्रवाह पारंपरिक माध्यमांत सहभागी झाला, तर तेथे असलेले साचलेपण दूर व्हायला नक्कीच मदत होईल. नवी भाषा, नवे विचार, नवा दृष्टिकोन, नवी लेखनशैली हे सारे पारंपरिक वाचकांनाही अनुभवता येईल. नेमके तेच घडताना दिसत नव्हते. सासवडच्या संमेलनात एक पाऊल पुढे पडले खरे; पण ते तेथेच थांबले. ही जोड पुढे काही गेली नाही. 'नुक्कड'च्या निमित्ताने ही जोड पुन्हा जुळून आली आणि आणखी पुढे सरकली. ती सरकायलाच हवी. या निमित्ताने ही गाठ घट्ट बसायला हवी. मराठी वाङ्मयाच्या पुढच्या वाटचालीसाठी ते उपयुक्तच ठरणार आहे. फक्त या निमित्ताने या दोन्ही माध्यमांनी थोडे आत्मपरीक्षण करायला हवे. ही आजची मुले काय लिहिणार, यांचे विषय काय असणार, यांना समाज समजतो का, यांना लेखन समजते का, यांच्या लिखाणाला खोली असते का, या आणि अशा कैक प्रश्नांच्या चष्म्यातून पाहणे पारंपरिक माध्यमांनी सोडायला हवे. ऑनलाइन माध्यमांत लिहिले जाते, त्याला साहित्य म्हणावे का, हा प्रश्नही मागे ठेवायला हवा. हाती छडी घेतलेल्या हेडमास्तरांच्या चित्रापेक्षा नव्या माध्यमाचे, त्या माध्यमांत लिहिणाऱ्या लेखकांचे स्वागत करणारे चित्र अधिक चांगले दिसेल. तुम्ही लिहा, आम्ही वाचू. आम्हाला नक्की आवडेल. आम्ही समजून घेण्याचा प्रयत्न तरी नक्कीच करू, अशी भूमिका असेल, तर ही नवी पिढी आनंदाने आपले लेखन घेऊन समोर येईल. त्याही पलीकडे जात आत्ता फक्त पारंपरिक माध्यमांतून लेखन करणाऱ्यांचे लेखन ऑनलाइन माध्यमांद्वारे तेथील वाचकांपर्यंत पोहोचविण्यासही मदत होईल. दरवाजे दोन्ही बाजूने उघडतील.

दुसरीकडे ऑनलाइन लेखकांनीही थोडी समजून घेण्याची भूमिका घ्यायला हवी. येथे मला वाटले, मी लिहिले, मी पोस्ट केले अशी पद्धत असते. पारंपरिक माध्यमांना ती रुचणारी नाही. तेथे तसे शक्यही होत नसते. लिहिल्यानंतर त्यावर संस्कार करणे पारंपरिक माध्यमांत महत्त्वाचे असते. संस्कार केल्यामुळे लेखन अधिक झळाळते, समृद्ध होते हा अनुभव आहे. ऑनलाइन माध्यमांमध्ये आपल्याला कोणीतरी काहीतरी सांगण्याची सवय नसते. आपल्याला कोण सूचना देणार आणि मुळात का देणार, हा प्रश्न असतो. हा अहंकार नाही किंवा स्वत:बद्दलची आढ्यताही नाही. या गोष्टीची सवयच नसल्याचा हा परिणाम आहे. ऑनलाइन माध्यमांनी इतरांचा दृष्टिकोन समजावून घेण्याची, सूचना ऐकण्याची सवय अंगिकारायला हवी. फक्त ऑनलाइन माध्यमांतच रमणाऱ्या लेखकांनी आता ऑफलाइन माध्यमांकडेही वळायला हवे. त्यांची ताकद, त्यांची पोहोच, त्यांना मिळणारा प्रतिसाद यांचीही चव चाखायला हवी. गावोगावी पोहोचलेल्या प्रदर्शनांद्वारे आपले साहित्य सर्वत्र कसे पोहोचते याचा अनुभव घ्यायला हवा. पुस्तक आवडल्यानंतर गावोगावहून येणाऱ्या प्रतिक्रियांचा आनंद मिळवायला हवा.

मराठी साहित्याचा प्रवाह अशाच पद्धतीने मोठा होईल. तुम्ही तुमच्या जागी आणि आम्ही आमच्या जागी, असे थांबून प्रवाह मोठा होत नसतो. तो होण्यासाठी सर्वच बाजूने प्रयत्न हवेत. हा प्रवाह जितका मोठा होईल, तितका व्हायला हवा. त्यासाठी मराठी माध्यमांत व्यक्त होणाऱ्या साऱ्यांनीच एकत्र यायला हवे. 'नुक्कड'ने हे काम त्यांच्या परीने केले आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेशी त्यांनी संपर्क साधला. अध्यक्षा माधवी वैद्य यांनाही हा उपक्रम आवडला आणि पुण्यात लेखकांसाठीची एक कार्यशाळाही झाली. ह. मो. मराठे यांच्यासारख्या ज्येष्ठ लेखकालाही ऑनलाइन माध्यमांतील या लघु आणि लघुत्तम कथा आवडल्या. या प्रकाराचे त्यांनी कौतुक केले. हे सध्याचे मराठी साहित्याला सुखावणारे दृश्य आहे. फक्त आता येथेच थांबून चालणार नाही. 'दोन ओंडक्यांची होते भेट' असे नको आहे. हातात हात घालून पुढे जाण्यासाठी ठोस काम व्हायला हवे आहे. साहित्य संमेलनातील कार्यक्रमांत लघु आणि लघुत्तम कथांना आणि त्याद्वारे या ऑनलाइन लेखकांना दिलेले स्थान ही चांगलीच गोष्ट घडली आहे.

आता ऑनलाइन माध्यमांतील लेखकांनीही एक पाऊल पुढे टाकायला हवे. आपल्या कम्प्युटरची स्क्रीन सोडून बाहेर बघायला हवे. आपले विषय वेगळे आहेतच; पण त्याही पुढे जाऊन लौकिकातले आणि आपल्या परिघाबाहेरचे विषयही धुंडाळायला हवेत. अशा विषयांना आजच्या लेखणीचा स्पर्श झाला, तर चित्र आणखी वेगळे होईल. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे पारंपरिक आणि ऑनलाइन या दोन्ही माध्यमांतील वाचकांना जोडून घ्यायला हवे. त्यांचाही विस्तार वाढवायला हवा. वाचकापर्यंत हे दोन्ही प्रकार घेऊन पोहोचणे आता अवघड नाही. 'बुकगंगा'सारखा उपक्रम यशस्वी ठरला आहे. ई-बुकमध्येच समाधानी असणाऱ्यांनी प्रत्यक्ष छापील पुस्तकाचा प्रयत्न करून पाहायला हवा. अशा पुस्तकांची प्रसिद्धी दोन्ही माध्यमांतून करता येईल. ती जास्तीत जास्त वाचकांपर्यंत पोहोचविता येईल. लेखक, प्रकाशक, समीक्षक, साहित्य परिषदेसारखी मोठी संस्था, ग्रंथालये, ऑनलाइन माध्यमांतील तज्ज्ञ, वापरकर्ते, ब्लॉग लेखक हे सारे हातात हात घालून उभे राहिले आणि पुढे चालू लागले, तर खूप मोठा परीघ कवेत घेता येईल. खेडोपाडी विखुरलेल्या आणि वाचनाची आस असलेल्यांपर्यंत पोहोचता येईल. ज्याला जे माध्यम हवे, ते माध्यम त्याच्यापर्यंत पोहोचेल. तसे झाले, तर इये मराठीचिये नगरी वाचक, लेखकांचा सुकाळू होईल. आपल्याला आणखी काय हवे आहे?

**Abhijit.thite@timesgroup.com**